# थांब जरा तू

(नातीगोती यावरील काव्यसंग्रह)


रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)



मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**थांब जरा तू** (नातीगोती यावरील काव्यसंग्रह)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर वरळी, मुंबई – ४०० ०३०.
भ्रमणध्वनी – ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : drmangushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट–२,
कवितांच्या बागेसमोर, ज्योतीनगर,
छत्रपती संभाजीनगर – ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस,
वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे – ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : मार्गशीर्ष शु. ३, शके १९४७
रविवार, दि. २३ नोव्हेंबर, २०२५

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, १–एन, सेक्टर ए, एन–१,
सिडको, छत्रपती संभाजीनगर – ४३१००३.
भ्रमणध्वनी – ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-995633-1-5

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : **₹ १५०/–**

सर्व रसिकवरांना
सादर समर्पण...

# मनोगत

## 'थांब जरा तू' माझ्या नात्यांचा, माझ्या मनाचा प्रवास

या काव्यसंग्रहाचे शीर्षक लिहितानाच माझ्या अंतर्मनात एक हलकी कंपरेषा उमटली. नाती या शब्दाला इतके अर्थ, इतक्या छटा, इतकी मिठी, इतके आसवे लाभलेली की त्यांना शब्दांत आणणे हे स्वतःमध्ये एक भावयात्रा होती. 'थांब जरा तू' हा संग्रह म्हणजे माझ्या जीवनातील त्या लोकांची, त्या क्षणांची नोंद जे येऊन थोडे थांबले, कधी माझ्यासाठी, कधी मी त्यांच्यासाठी.

ही सर्व कविता एखाद्या ठरवून केलेल्या लेखनातून आलेली नाहीत. त्या अनेकदा एखाद्या साध्या प्रसंगातून उमलल्या. कधी आईच्या डोळ्यांच्या कडांवर उभ्या राहिलेल्या पाण्याच्या थेंबातून, कधी मुलाच्या अनाहूत बिलगण्यातून, कधी मित्राच्या शांत पाठिंब्यातून, कधी पावसाच्या थेंबांनी जुन्या आठवणीत उघडलेल्या दारातून. माणूस म्हणून जगताना प्रत्येकाला नाती ही हात धरून शिकवतात. कोणाला जपायचं, कोणाला सोडायचं आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे स्वतःशी कसं जोडून राहायचं.

या कविता लिहिताना मला एक गोष्ट सतत जाणवत राहिली नाती टिकवण्यासाठी मोठे शब्द लागत नाहीत; लहान थांबे लागतात. कधी एखादा श्वास एकत्र घ्यावा लागतो, कधी एखाद्या खिडकीजवळ बसून फक्त शांतता वाटून घ्यावी लागते, आणि कधी एखाद्याच्या नजरेत साठलेलं न बोललेलं ऐकावं लागतं.

या संग्रहातील बहुतेक कविता 'मनाच्या संवादातून' जन्मल्या. त्या माझ्या अंतर्मनाच्या पानावर लिहिलेल्या डायरीतील नोंदी आहेत. सुंदर, वेदनादायी, शिकवण देणाऱ्या आणि मनाला मोहरवणाऱ्या. नाती म्हणजे माणसाचा खरा खजिना आणि हा काव्यसंग्रह म्हणजे त्या खजिन्यातील काही निवडक रत्नांची मालिका.

मला हेही ठामपणे वाटतं की प्रत्येक नातं वेळेनुसार बदलतं. कधी दुरावते, कधी जवळ येते, कधी नव्याने उमलते. या बदलांचे प्रतिबिंबही माझ्या कवितांत उतरत गेले आहे. काही कविता विरहाच्या आहेत पण त्या दुःखाची नाहीत; त्या स्वीकाराच्या आहेत. काही कविता प्रेमाच्या पण त्या जाहीर घोषणांच्या नाहीत; त्या अंतर्मुख मिठीच्या आहेत. आणि काही कविता एकटेपणाच्या पण त्या एकटेपणाला अर्थ देणाऱ्या आहेत.

नाती कधी तुटतात, कधी सांधली जातात, कधी सांधल्यासारखी वाटतात पण मनात लपलेल्या सांगाड्यांच्या चिरा राहतात. या सर्व अवस्थांमध्ये मानवी मन स्वतःला शोधत राहतं. 'थांब जरा तू' या संग्रहाने मला मनाच्या या शोधप्रवासाला शब्द देण्याचं भाग्य दिलं.

हा संग्रह प्रकाशित करताना मी एकच आशा मनात बाळगते. या कविता वाचकांच्या मनात कुठेतरी थोडंसं थांबतील, त्यांच्या आठवणीत एखाद्या प्रियजनासारख्या रेंगाळतील, आणि त्यांना त्यांच्या स्वतःच्या नात्यांकडे नव्या नजरेने पाहायला प्रवृत्त करतील. नाती जर मनाला स्पर्श करतात, तर कविता त्यांचा प्रतिध्वनी आहे. हा प्रतिध्वनी आपल्या प्रत्येक वाचकाच्या हृदयात गुंजत राहावा हीच माझी मनापासूनची इच्छा.

**– डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# प्रस्तावना

## 'थांब जरा तू' नात्यांची मंद उसंत

नाती ही जीवनाच्या विस्तीर्ण नदीतील शांत खळखळ असतात. कधी शांत, कधी चंचल, कधी अथांग, कधी अगदी स्पर्शलाही न येणारी. माणसाला माणूस धरणारी, थांबवणारी, जगण्याला अर्थ देणारी हीच नाती जेव्हा कवयित्रीच्या लेखणीतून उमलतात, तेव्हा त्यांच्यात एक वेगळीच माधुरी उतरत जाते. 'थांब जरा तू' हा काव्यसंग्रह म्हणजे अशीच भावगंधारी जिथे प्रत्येक कविता नात्याच्या एखाद्या बाजूला नवे प्रकाश देऊन उभी राहते.

जगण्याच्या धावपळीत 'थांब' ही आज दुर्लभ झालेली हाक आहे. आपण एकमेकांच्या जवळ असूनही कितीतरी वेळा एकमेकांना पाहतच नाही; पाहिलं तरी समजून घेत नाही. या संग्रहातील कवितांमध्ये मात्र ही हाक जिवंत आहे. कोणीतरी एखाद्याला थांबवून घेतं, एखाद्याच्या खांद्यावर हात ठेवतं, एखाद्याच्या डोळ्यात शांतपणे बघतं, एखाद्या मनाच्या दारावर हलकेच टकटक करतं. नंतर उघडणाऱ्या शांततेतून या कविता जन्म घेतात.

ज्येष्ठ साहित्यिकांची एक वैशिष्ट्यपूर्ण छाप या संग्रहात दिसते. भावनांचा नाजूक, पण ठाम आविष्कार. वा. पु. काळे यांच्या ललित लेखनातील सहजता, पु.ल. देशपांडे यांच्या माणसांवरील अढळ प्रेमाचे प्रतिबिंब, वि.स. खांडेकर यांची तत्त्वनिष्ठ दृष्टी, आणि नासिर फडके यांच्या ओळी जशा मनाच्या धुंदीत तरंग निर्माण करतात, तसाच एक सूचक, अव्यक्त नाद कवयित्रीच्या शब्दांत दिसतो.

या कवितांमध्ये नाती कोणत्या एका चौकटीत बंदिस्त नाहीत. इथे आई आहे, वडील आहेत, मुलं आहेत, मित्र आहेत, विरहाच्या रेषेवर उभं राहिलेलं प्रेम आहे, आणि अचानक जीवनात भेटून गेलेली ती अनाहूत माणसंही आहेत ज्यांच्या स्मृती मनाच्या काचेला धूसरपणे चिकटलेल्या असतात. प्रत्येक नात्याला इथे

स्वतंत्र ध्वनी आहे. कधी ते बोलतात, कधी ते ऐकून घेतात, कधी ते गप्प बसतात. आणि या तिन्ही अवस्थांमध्ये प्रेमाची खोली अधिक जाणवते.

कवयित्रीची भाषा नात्यांच्या धाग्यांना घट्ट बांधून ठेवण्याचा प्रयत्न करत नाही; उलट ती त्यांना मुक्तपणे वाहू देते. त्यामुळे शब्द कधीच बोचरे वाटत नाहीत; ते ओलसर वाटतात. जणू एखाद्या तळ्यातल्या प्रकाशरेखांनी मनामध्ये पसरलेली सौम्य लहरी. प्रत्येक कविता ही एक काचेसारखी पारदर्शक, तरी नाजूक.

नात्यांच्या गुंतागुंतीचे आणि साधेपणाचे दोन्ही पैलू या संग्रहात एकत्र दिसतात. प्रेम फक्त शब्दांत नाही; ते नजरेत आहे. राग फक्त तावात नाही; तो काळजीत आहे. विरह फक्त वेदनेत नाही; तो स्मृतीत आहे. आणि भेट फक्त हसण्यात नाही; ती एका शांत क्षणात आहे. या कवितांचे सौंदर्य हे की त्या नात्यांकडे पाहतात तसेच, कोणत्याही आडपडद्याविना जसे एखादे मूल पहिल्यांदाच पावसात हात पुढे करते तसे.

'थांब जरा तू' हा काव्यसंग्रह वाचताना वाचकाला एका गोष्टीची जाणीव सतत होते. नाती ही वेळ मागत नसतात; ती उपस्थिती मागतात. हा संग्रह म्हणजे त्या उपस्थितीचे, त्या थांबण्याचे, त्या श्वासभर शांततेचे काव्यमय रूपांतर. कविता कधी सळसळत्या भावना आहेत, कधी तुटलेल्या मनाचे सांधे, कधी आठवणींचे दाट सावट, तर कधी भविष्याच्या उजेडात मिसळणारी आशा. या संग्रहातील प्रत्येक ओळ 'थांब' या शब्दाला नवा अर्थ देते. मनात थांब, नजरेत थांब, स्पर्शात थांब, आठवणीत थांब, पण सर्वांत महत्त्वाचं म्हणजे एखाद्याच्या मनात जपलेल्या कोमल कोपऱ्यात थांब.

**श्री. प्रशांत मयेकर**
प्रशासकीय अधिकारी
मा. मुख्यमंत्री सचिवालय
मंत्रालय, मुंबई

# अनुक्रमणिका


१) ओल्या खुणांचे उरती ठसे ... ११
२) ना प्रेमाचे त्या मोल ... १२
३) कन्या सासुराशी जाते ... १३
४) हे साधेपण खुलावे ... १४
५) येते जीवनी जेंव्हा कोणी ... १५
६) नाते आगळे बहिणीबहिणीचे ... १६
७) जन्मोजन्मीचे संचित राहील ... १७
८) मेंदीमधल्या गंधामधले ... १८
९) एक उंबरा सदैव राहील ... १९
१०) सारेच प्रश्न वेडे ... २०
११) घर आपुले ... २१
१२) रंग गोड हा काळा ... २२
१३) रेश्माचं पाणी पाणी ... २३
१४) ये ग ये रखुमा राणी ... २४
१५) अले किती गोड तू ... २५
१६) आई आईच असते ... २६
१७) आई नावाचं पुस्तक असलं ... २७
१८) झुंजूमुंजु गावामंदी ... २८
१९) बोकुला छकुला ... २९
२०) अग अग हरणुली ... ३०
२१) जीवन दुधावरली साय ... ३१
२२) येईल अंतःकरणा भरती ... ३२
२३) हीच दे देवा सखी साजणी ... ३३
२४) क्षण ऐसे वेचावे इथले ... ३४
२५) आई म्हणजे तत्त्व चिरंतन ... ३५
२६) हे शिवा शंभो रे ... ३६
२७) कृष्णबाळा मोह चाळा ... ३७
२८) अनुबंध मग तिथले ... ३८
२९) माझी वात्सल्याची ठेव ... ३९
३०) म्हणून देतो जन्म आईला ... ४०
३१) भाऊबीज ओवाळीते ... ४१
३२) तैसीच वाटे ही चूल जननी ... ४२
३३) बीज अंकुरे अंकुरे ... ४३
३४) बावळ्या कथुल्या खुळ्या ... ४४
३५) नको दटावू आई मजला ... ४५
३६) जुळती रे कैसी ही नाती ... ४६
३७) नाते या जन्मीचे ... ४७
३८) शिवें पार्वती तू कल्याणी ... ४८
३९) घर गोकुळाचा भास ... ४९
४०) दुधावरची साय ... ५०
४१) प्रियवरा वळून पाहतो का ... ५१
४२) सांगू कसे श्रीरंगा ... ५२
४३) प्रिया कृष्णवरा तूच ना ... ५३
४४) शोनुली गोडुली बाहुली ... ५४
४५) माझं सपान मानीन ... ५५
४६) धागा मोरपीस ... ५६

४७) तुझे माझे नाते,
द्वैत की अद्वैत ... ५७
४८) गाली हसू
तर दुःख पांगते ... ५८
४९) मनी चिमणा उपजे ना ... ५९
५०) हृदयी साठवू
प्रभु श्रीराम ... ६०
५१) नाते भासे अनोळखी ... ६१
५२) घे पदरी तुझ्या ... ६२
५३) आई वेडी एक बेडी ... ६३
५४) चिमण्या स्वप्नातून
रमे आई ... ६४
५५) काय करयोय बाबा ... ६५
५६) जन्म सारा तुझ्यासाठी ... ६६
५७) आता नमिते
तुला प्रभाकरा ... ६७
५८) पोकळी नात्यात होते ... ६८
५९) ऋणानुबंधांचे
बंध अगणित ... ६९
६०) किती पावसाळे हे यावे ... ७०
६१) राजहंस राजा दिसे ... ७१
६२) बहरली वेल नात्यांची ... ७२
६३) सांज टेकली
क्षितिजपाशी ... ७३
६४) ओल्या पंखांची झळाळी ... ७४
६५) भाग्यास कोण लांघा ... ७५
६६) प्रीत पाडवा
भेट तुला घे ... ७६
६७) सण भाऊबीज येतो ... ७७



## (१)
## ओल्या खुणांचे उरती ठसे

ओल्या खुणांचे उरती ठसे
अन दुःख उरते सदाची कसे
ती ओल मायेची राहते मनी
जखमांना ओल्या लपवे कुणी

नात्यांचा ओलावा पापणी ओली
ओल्या आठवणी अन पाठवणी ओली
ओल्या दवांची पहाऽऽट ती ओली
ओल्या कळ्यांची उमलवाटही ओली

ओलेत्या भुईचे गर्भा धारणे
बीजातून ओलावी कोंब अंकुरणे
ओल्या नदीच्या खुणा ओल भरल्या
तीरावर पावलांच्या नक्षीने भरणे

तृषार्त चोचीतले चातकपण ओले
आईच्या डोळ्यातील वात्सल्य ओले
नको कोरडे काही ते रूक्ष होते
मन ओले चिंब प्रीत बोल किती ओले

ओल्याशा देहातील चैतन्य ओले
ओल्या अंतःकरणी आत्मभान ओले
जगण्यातील जगणे हे सदा ओले ओले
मरताना कंठातील थेंब चार ओले

दि.०८/०१/२०२४
रात्री १०.५९ वा.



## (२)
## ना प्रेमाचे त्या मोल

कळ उठते,
कळते ना कोणाला
ती आत खोलवर दुखते,
ना कळते कोणाला

कोणाचे दुखरे शब्द,
कधी कुणी करते निःशब्द
ज्याचे त्याचे अपसमज,
काळीज होते मज स्तब्ध

कधी कुणी काही तरी बोले,
कधी कुणी बोलणे टाळे
दिसते ना काहीच मजला,
भवितव्य वाटते काळे

ना प्रेमाचे त्या मोल,
जरी भाव मज मनी खोल
कधी वाटत राहते सारे,
सारेच जगती या फोल

उमलण्या आधी कोमेजून,
रोजची स्वप्न हे जातं
मनी उगाच वेडं राहतं,
खरं नसलेलंही जे नातं

दि.१४/०१/२०२३
रात्री ११.४१ वा.



## (३)
## कन्या सासुराशी जाते

कन्या सासुराशी जाते
जाता पोकळी करते
करताना एक कुळे
कुळ माहेर सोडते

तिच्या जाण्याचा सोहळा
सोहळ्यात सारे गोळा
गोळा उठतो पोटात
पोटचा देताना गोळा

विधी उपचार होती
होती कुलधर्म सारे
सारे निभावून नेते
नेते संगती संस्कारे

हौस पुरवून घेते
घेते हवे ते सगळे
सगळ्यात हक्क तिचे
तिचे वावर आगळे

वसवते एक गाव
गाव एक उसवतो
उसवुनी धागा आत
आत मना निसवतो

तिचा वावर सुखद
सुखद लाडिक ते बाल्य
बाल्य तरळते डोळा
डोळा आसवे हो गोळा

लपवून भावना मी
मी न रडणार आहे
आहे छकुली सुखात
सुख मागणार आहे

तिच्या पावलाशी देवा
देवा आनंद पाकळी
पाकळीत दव राहो
राहो प्रीत भरलेली कळी

कन्या सासुराशी जाते
जाता वळून पाहते
पाहताना गोठे वाट
वाट आठवा वाहते

दि.२५/०१/२०२४
रात्री ११.४९ वा.



## (४)
## हे साधेपण खुलावे

डोळ्यात तुझिया मजला
पाहण्याची सवय झाली
कसे सांगू तुजला सजना
रूपा झळाळी आली

हे साधेपण खुलावे
जेंव्हा तुला भुलावे
नजरेत तुझ्या प्रीती
हळुवार मज कळावे

अलगद मी येते रोजच
स्वप्नी तुझ्या तू म्हणतो
दिसता समोर मजला
तू एकटक पाहतो

शृंगार नाही दुसरा
तुज भावनांना ल्येते
लागे कशी नजर ही
दृष्टीत तुजला घेते

ना दागिन्यांचा सोस
ना अन्य काही हौस
तू जपशी जीवापाड
अनमोल प्रेन हेच

लाभेल असे नाते
जन्मांतरी सदाची
माझ्यासवे हा राजस
खंबीर असा उभाची

दि.२७/०१/२०२३
रात्री ०९.५६ वा.



## (५)
## **येते जीवनी जेंव्हा कोणी**

असेल किंमत मित्राची तर
हात मैत्रीचा धरशील
कष्ट साहण्याची जर हिंमत
प्रीत प्रियवरा करशील

वचन निभावणे जमेल जर तुज
तरंच शपथा देशील
असेल माझे महत्त्व तुजला
तरंच संगती येशील

आठवशील मज मनात असतील
खऱ्या तुझ्या भावना
खोल रुजवशील माझ्यावरची
प्रीत प्रिया सांग ना

वाट पाहणे किती रे अवघड
कळेल का तुज कधी
क्षणा क्षणाची किंमत करणे
जमेल का तुज आधी

तरंच उरेल अर्थ आपुल्या
नात्याला मग खरा
वाट प्रीतीची जितुकी सुंदर
मार्ग कठीण हा जरा

येते जीवनी जेंव्हा कोणी
सांभाळून ठेवणे
देव जुळवितो अगणित नाती
कुणा कसे ते कळणे

दि.२८/०१/२०२३
सकाळी ०७.१७ वा.



## (६)
## नाते आगळे बहिणीबहिणीचे

मी निघाले घेऊन गाडी
घेण्या फुलांची वाडी
देशभक्तीने सजली रिक्षा
गर्दीत मार्ग ही काढी

आहे करवली लग्नाघरची
बहीण थोरली नवरी
सजावटीला नानाविध मग
दिसती फुले साजरी


गेंद झेंडूचे पिवळे केशरी
शेवंती मोगरी
निशिगंधाच्या सुरभीत न्हाते
आर्चिड का लाजरी

घेऊन जाईन फुलराण्या या
सजवून घरदाराला
करून तोरणे बांधून देईन
फुलमाळा हाराला

नाते आगळे बहिणीबहिणीचे
वीण प्रेमाची घट्ट
असतील भाऊजी जरी प्रिय तुला
ताई तुझी मी पट्ट

वळण नवेसे सुंदर येते
जरी मुली जीवनी
माहेर कधीही सुटते न तुटते
हळवे सदा ते मनी

दि.२८/०१/२०२३
सकाळी ०७.५७ वा.



## (७)
## जन्मोजन्मीचे संचित राहील

क्षण मेंदीचे रंगून जातील
नक्षीत स्वप्ने कोरून येतील
हातावरती सुख संसारी
चित्र देखणे उभरून येतील

येईल जवळी क्षण लग्नाचा
मंडप भरला फुलून जाईल
सगेसोयरे आप्त स्वकीय हे
सनई मंगल सूर ही गाईल

प्रिये लाडके माझे छकुले
सप्तपदीची ऐकून वचने
जीव सुखावेल पाहून सारे
सारे लाभू दे तुला मागणे

आनंदाच्या लहरींवरती
असे सोहळे झुलतील बाळे
पाठवणीच्या क्षणात मन हे
कसेबसे मग मला सांभाळे

कधीही न हे मिटतील आठव
कधीच मेंदी पुसट न होईल
मनात सारे उमटून येईल
जन्मोजन्मीचे संचित राहील

दि.२९/०१/२०२४
सकाळी ०८.१८ वा.



## (८)
## मेंदीमधल्या गंधामधले

किती दिवसांनी मेंदी भरले
हात निरखते आहे
पुन्हा नव्याने त्या दिवसांची
ओढ रेखते आहे

त्या प्रेमाच्या हळव्या हळव्या
आजही स्मरती वेळा
ती वचने त्या शपथा साऱ्या
मनात होती गोळा

नव्या नवेल्या प्रीतीमधल्या
आतुर लाघववेळा
भेटीसाठी रोजचा दिवस
होता आसुसलेला

साथ आपुली जन्माची मग
ठरवून गेली नाती
पुन्हा एकदा हसली नाजूक
मेंदी हातावरती

आज आठवले पुन्हा ते सगळे
सगळे झाले ताजे
मेंदीमधल्या गंधामधले
दरवळ तुझे नि माझे

दि.२९/०१/२०२३
रात्री १०.५३ वा.



## (९)
## एक उंबरा सदैव राहील

लेक चालली सासरघरला
आठवणींचा शेला विसरला
कुठून कोणती जुळती नाती
विवाहदिन हा विशेष ठरला

एका नयनी सुख ये दाटून
एकातून पाठवणी पाणी
दाटून येतो कंठ सारखा
गिळून आवंढे वावरतो आणि

सरसर सरकून जातो पट हा
बालपणीच्या स्मृती दाटती
जन्मापासून पुन्हा मी जगतो
क्षण ते सारे उभे वाटती

भेटून घेतो जरी साऱ्यांना
आत आतडे तुटते वेडे
लेक द्यायची माहीत परक्या
न सोडवावे मधुर हे कोडे

संसाराची स्वप्ने झलकती
तिची पावले वळती सासुरा
जा बाळे जा मिळो सौख्य तुज
सांभाळून घे नवी ही धुरा

क्षणभर वाटे क्षण ती थांबो
कशास पडतो मना मोह हा
एक उंबरा सदैव राहील
वाट पाहता माहेरचा हा
वाट पाहता माहेरचा हा

दि.३१/०१/२०२४
रात्री ०९.११ वा.

## (१०)
## सारेच प्रश्न वेडे

जाणून घ्यायचे ना
आता पुन्हा नव्याने
नाते जुळून येते
आता पुन्हा नव्याने


संवाद साधताना
खुलली कळी मनाची
वाटून ओढ गेली
हळव्या मधुर क्षणाची

नजरेत प्रेम होते
ओसंडू वाहणारे
स्वप्नही खुलून आले
डोळ्यात राहणारे

भेटीत तृप्ती वाटे
तरी आस भेटण्याची
वाढे पुन्हा नव्याने
का ओढ भेटण्याची

सारेच प्रश्न वेडे
सुटतात का कधी ते
रहावे अनुत्तरित
काही तरी कधी ते

दि. २४/०२/२०२५
रात्री ११.२० वा.



## (११)
## घर आपुले

कधी होईल घर आपुले
अशा हिरवाईच्या कुशीत
जिथे वाहे खळाळून
झराही स्वतःच्या खुशीत

उन्हांची रांगोळी पडते
घराच्या अंगणी अवखळ
झुळूक वाऱ्याची वाहत ये
सतत गुणगुणणारी चंचल

असा झरतो हा पाऊस बघ
मला भिजवून जाताना
हळूच मैनाही फांदीवर
निरखते मजसी गाताना

झावळ्या झाडांच्या येती
वाकुनी सावली द्याया
छतावर साळुंक्या जमती
झिम्मा फुगड्या खेळाया

सांजेला घरट्यात किलबिल
पिलांना भेटते माय
तुझेही त्याचवेळी रे
घरकुली वळती बघ पाय

मी पडवीत वाट पाहणारी
तुझ्यासाठीच थांबेन
प्रीती पाहून आपुली रे
रातही रोजच लांबेल

नभातील चांदण्या येती
रातीला खाली उतरून
गोडी नात्याची पाहून
किती जातील रे हरखून

घरातील कोन्याकोन्यात
गंधाळून वावर जातील
हिरव्या सृष्टीने गाणी
प्रीतीची बहरा येतील

दि.०२/०३/२०२४
सायंकाळी ०५.२५ वा.



## (१२)
## रंग गोड हा काळा

रंग काळा काळा
आई, आपुला रंग का ग काळा?
ढवळे पाणी, आकाश पांढरे
हंस स्वच्छ पांढराळा
आपुला रंग का ग काळा?

बदक पांढरे गोरे गोरे
कोंबडा तसा पांढरा हा बगळा
सारसपक्षी किती ढवळे ते
ढवळा कबुतर मेळा
आपुला रंग का ग काळा?

एखादा पोपट दिसे पांढरा
मोरही दिसतो शुभ्र आगळा
पेंग्विन पुढूनी धवल धवल किती
बघ ना पांढरा गायबगळा
आपुला रंग का ग काळा?

काकाकुआ किती गोरा गोरा
करकोचा ना काळा
समुद्रपक्षी सुंदर ढवळे
ढवळा त्यांचा चाळा
आपुला रंग का ग काळा?

ढग पांढरे चंद्र पांढरा
चांदण्या गोऱ्या ढवळ्या
नदी पांढरी जळ हे शुभ्र
फुले पांढरी तशाच ह्या कळ्या
आपुला रंग का ग काळा?
सांग ना, आपुला रंग का ग काळा?

असू दे आई रंग कसाही
पाठीवरती तुझ्या मी बसलो
आई जवळी आहे म्हणुनी
आनंदाने बघ ग हसलो
रंग छान बघ आपुला काळा
नजर न लागे बाळा

आई, रंग गोड हा काळा

दि.१३/०३/२०२४
सकाळी ०८.४३ वा.



## (१३)
## रेश्माचं पाणी पाणी

धुंद पावसाची धार
अंग भिजूनीया गार
चला चला रे पिलांनो
थंडी वाजतेय फार

सारा डोंगर ओघळे
झरझर झऱ्यावाणी
गवताच्या अंगावर
रेश्माचं पाणी पाणी

झाडं अंघोळ करती
स्वच्छ सुंदर दिसती
बीज जमिनीमधले
गोड गालात हसती

पाने पाने चिंब ओली
तरारून मने गेली
रानारानात सुगंधी
माती अत्तरांची झाली

केस अंगावरले हे
असे उभारून आले
करू पानांची छतरी
रान हुडहुडी झाले

या रे पिल्लांनो जवळी
ऊब आईची कवळी
जरा पाऊस पाहू या
त्याची गाणी सोनसळी

दि.०७/०४/२०२४
०९.०४ वा.



## (१४)
## ये ग ये रखुमा राणी

ये ग ये ग रखुमाई
साऱ्या जगताची आई
राबराबतेस किती
माझी अर्धांगाई

चूल पेटती रहावी
होते अन्नपूर्णा तू
पालनास जगताच्या
जीवरस भरणा तू

तूच स्फूर्ती प्रेरणा
तूच संकट तारणा
असुरांशी लढताना
तूचि काल गे मारणा

स्मृती बुद्धी मती तूच
प्रज्ञा मेधा नि प्रतिभा
माय सरस्वती रूप
तुझी ज्ञानाचीच आभा

चालवितो मी संसार
जगताचा पालनहार
असे वाटे जगा परि
माझ्या शक्तीची तू धार

फुलावाणी तू नाजूक
काळजानं कवळी ग
वेणी शेवंती माळतो
माझी मनपाकळी ग

ये ग ये रखुमा राणी
तुझ्या ओठी हासू गाणी
तुझी माझी जोडी राहो
जगी माय बापावाणी

दि.०८/०४/२०२४
सकाळी ०९.२९ वा.



## (१५)
## अले किती गोड तू

अले किती गोड तू
सोन्याची फोड तू
छोटुशा दोस्त माझा
प्रेमाचा जोड तू

ये ना ये जवळी
खाऊ या सोनकेळी
हासू तुझं माझं रे
हसताच हसे खळी

केश तुझे माझे
सोनेरी चमचम
दात कशे आपुले
आनंदी घमघम

तुझं माझं जमतं
नातं रे कोणतं
सवंगडी तू
मन खळखळतं

नको मोठं होऊ या
बाळंच राहू या
रोज रोज भेटून
खेळत राहू या

दि.१३ /०४/२०२४
मध्यरात्री १२.५७ वा.



## (१६)
## आई आईच असते

माय छत होत जाते
आभाळ गळताना
देह छत्री करते
ऊन्हं झळा झळताना

तिची ऊबदार ऊब
ऋतू कोणताही असो
तिच्या स्पर्शात गोडवा,
नजरेत गाव वसो

तिचा पोलादाचा देह
मन मऊशार लोणी
आई विना देव इथं
डोळा पाहिला का कोणी

तिच्या दिवसात युगे
जाती सामावून रोज
पिल्लांसाठी सोडते ती
किती सहजीच नीज

किती सोसते भोगते
देह झिजवून देते
बीज मायेचे पेरून
स्वतः उगवून येते

सुख मिळावे बाळांना
दुःख डोईवर झेले
देई अमृताचा पान्हा
पीत विषाचे ही पेले

तिचे रूप कोणतेही
माय आई पाखरू की
पशु पक्षी कीडा मुंगी
प्रिय गाय वासरू की

आई आईच असते
तिच्या हृदयी वात्सल्य
माय असते म्हणून
किती विसावते बाल्य

नाही उपमा कशाची
माय लेकरांस जगी
आई नसता जगात,
सारे  पोरके ना उगी

आईपण नाही सोपे
देह मन काळीजही
आई आत्म्याचे नाव
परमात्मा तीच ही

दि.१८/०४/२०२४
रात्री ११.५४ वा.



## (१७)
## आई नावाचं पुस्तक असलं

आई नावाचं पुस्तक असलं
कसं वाचावं कळंचना
झरा मायेचा कुठून व्हातोया
अक्षर प्रेम हे वळचना

रागावती अन जरी कावती
आत तिला ते बोचत जाय
अखंड वात्सल्याच्या धारा
प्रेमळ सरिता असतीया माय

खस्ता खाऊन कष्ट उपसती
पान पुस्तकाचे ती जिव्हाळा
तिची बांधणी पक्की इतकी
किती जन्माचा लावते लळा

तिच्या पुस्तकावरती न नाव
तिचे कोणते नाही गाव
झिजवत जाते अखंड काया
चंदन काळीज सुगंध ठाव

क्षणात करते मोठा त्याग
जीवनी फुलवुन देते बाग
झळा न लागती असता ती
दूर राहते दुःखाची आग

आई नावाच्या पुस्तकातले
जमतील जर का वाचून घे
मंगल सुंदर क्षण मायेचे
फुलापरी ते वेचून घे

आई असता किंमत न कळे
नसता पडते भुई थोडी
काया पुस्तक जाते येथून
अक्षर आठवणी गोडी

डोळ्यामधले आसू पाहून
ती स्वर्गातून मग रडते
आईवाचून पवित्र प्रीती
कुणी न करते बघ अडते

तिच्यावचूनी जगणे निष्फळ
नीरस मन हे लुळे पडते
ती असताना स्वर्ग भुईवर
किमया ऐसी रे घडते

म्हणून ज्यांच्या जवळी हे पुस्तक
भाग्यवान ते या जगती
आई आई हे नाव अगाधची
अमोल ईश्वरी रूपच ती

दि.२३/०४/२०२४
सकाळी ०८.२१ वा.



## (१८)
## झुंजूमुंजु गावामंदी

झुंजूमुंजु गावामंदी
नीज सुटते सहज
भल्या पहाटे गावाची
सुरू होते गजबज

भूमातेच्या चरणाला
हात जोडतात लोक
क्षमा मागून कामाला
सारे लागती बिनधोक

केशराच्या सड्यामंदी
रोज नाहते पुरव
पिंपळाच्या पारावर
जगण्याचा दिनरव

किलबिल पक्षी सारे
एका सुरात गात्यात
शेताकडं शेतकरी
उमेदीनं बा जात्यात

जात्यावरल्या ओवीत
जगण्याची रीत गाऊ
वासुदेव ये अंगणी
पसाभर दाणं देऊ

सडा शेणाचा घालून
चूल लिंपून ती घेता
देती भाकर रोजच
कालवण चव देता

दुध दुभत्या गायींची
गोठ्यातली सेवा गोड
बैलजोडी ती खिल्लारी
नातं समद्यांशी अजोड

झुंजूमंजु गावामंदी
लाट चैतन्याची फिरं
एक गाव रामा पारी
जल्मभरी मनी उरं

दि.०१/०५/२०२४
संध्याकाळी ०७ ११ वा.



## (१९)
## बोकुला छकुला

का ग आई, का ग आई
सांग ना मला काही
सारखे  मी विचारतो
तुला किती प्रश्न बाई

आपण उंदीर का पकडायचे
त्यांच्या मागे किती धावायचे
डोळे  मिटुनच दूध का प्यायचे
उडी मारता पायावरच का यायचे

आपणही खायला
ताट का नाही घेत
पाहुण्यांना आपल्या
हॉटेलात का नाही नेत

नवे नवे कपडे, चपला गॉगल
फिरायला गाडी का ग नसावी
आपल्याही घरात टी व्ही नि मोबाईल
दुधाची डेयरी मस्त असावी

काय बाबा सांगू मी
किती तुझे प्रश्न
सुचतच नाही काही
निरुत्तर प्रश्न

भंडावून सोडतो हा
बोकुला छकुला
डोळे त्याचे खोडकर
सारखेच विचारती काहीतरी मला

कान बघा कसे हो
टवकारलेले
डोळे ते घारुळे
वटारलेले

आता काय बोलू मी
बघतोय कसा
सासराच जाब मला
विचारतो जसा

दि.०३/०५/२०२४
रात्री ११.०१ वा.



## (२०)
## अग अग हरणुली

अग अग हरणुली
किती किती गोडुली
सारे मला म्हणती
तू हरणीच छोटुली

तुझे डोळे किती छान
भिरभिर चंचल
मीही तशी पाहते
म्हणे आई चंचल

कान किती सावध
ऐकती सारे ते
तोंड तुझे नाजूक
किती बरं प्यारे ते

अंगावर ठिपके
पांढुरके छोटेसे
तसा माझा झगाही
वर त्याच्या बुंदकेसे

दोघे आपण मैतर
जवळी तू  ये ना
कित्ती कित्ती गोडू तू
उऽऽऽम्म ... उऽऽऽम्म पापी दे ना

दि.०४/०५/२०२४
रात्री ०८.३२ वा.




## (२१)
## जीवन दुधावरली साय

हात मायेचा भोवती
तिनं असा गुंडाळला
जीव इवलुसा परी
जीवापाड सांभाळला

तिचं नाव गाव काय
समद्या हाय का माहीत
वसुंधराराणी माय
कोशी समदे ऱ्हाईत
तिच्या कोशात ऱ्हाईत

तिच्या हाताची पालवी
लई मऊशार गार
हिरव्या पांघरुणात ती
लेकरांशी जपं फार

पंचमहाभूतं तिच्या
लेकरांच्या दिमतीला
पर जाणीव ठेवावी
तिच्या अमोल किमतीला

सारं भकास करून
आता उजाड माय ती
जपा जपा सृष्टी ती तर
जीवन दुधावरली साय
जीवन दुधावरली साय

दि.०५/०६/२०२४
रात्री १०.०३ वा.
विश्व पर्यावरण दिनाच्या शुभेच्छा



## (२२)
## येईल अंतःकरणा भरती

साथ तुझी मज मिळता राजा
आयुष्याचे सोने
मनासारखा जीवनसाथी
जगणे मौलिक होणे

भाव भावनांची ही वीण जी
घट्ट गुंफिली जाते
त्या नात्याला न आडपडदा
पारदर्शीपण राहते

नजरेमधली भाषा बोलकी
शब्द लाजरे होती
मदनोत्सव हृदयाच्या अंगणी
नित्य साजरे होती

हलके हलके मन हे उडते
हात हाती असताना
जीव कसा मी तगवून ठेवू
दूर सखा असताना

आनंदाचे सुखवुन वारे
गुंजन कानी करती
संगत हवी ती जर का लाभता
क्षण भारून हे भरती
येईल अंतःकरणा भरती

दि.१३/०६/२०२४
सकाळी ०९.२५ वा.



## (२३)
## हीच दे देवा सखी साजणी

कलत्या उन्हात गडे साजणी
तुझा आधार मज लाभू दे
चढत्या काळी साथ दिली तू
गंध मायेचा वाढू दे

थरथरणाऱ्या हातालाही
कंप का सुटतो कळंच ना
निर्बल झाला तुझा ग साथी
आता त्याला काही वळंच ना

वळवून घेतीयास आज बी मला
शब्द तुझा ना कधी दुखरा
क्षणाक्षणाला घट्ट नाते तू
केले म्हणूनच म्या ना उपरा

उभा म्हणूनच आहे सांगतो
पाहून सोबती कारभारणी
धडकत राहतं काळीज येडं
वाटतंय जगणं सत्कारणी

तू मागितलं साता जल्माचं
आपलं नातं देवासनी
म्या बी मागतो जल्मोजल्मी
हीच दे देवा सखी साजणी

दि.२९/०६/२०२४
सकाळी ०७.४४ वा.

## (२४)
## क्षण ऐसे वेचावे इथले

क्षण ऐसे वेचावे इथले
ओंजळीत जगण्याचे जणु
जे गेले ते पुन्हा न येणे
बरसून गेलेले ते घनु

शब्द आजचा विरतो न उरतो
पुन्हा वैखरी वरचेवरी
बांधून ठेवावे या नात्या
कसे कुणी नि कितीतरी

वय जे वाढते बाल न होणे
पुन्हा पुन्हा पुढे सरकत जाणे
वळण मागचे मागेच राहते
नवीन वळावे नवेच ठाणे

पुन्हा नव्याने सूर्य उगवतो
नव्या प्रभाती नव गाणे
क्षणाक्षणाला नव्या क्षणाने
नवीन होऊन झणी जाणे

आता वाटते उद्या कोणता
काल कोणता गेला उडुनी
क्षण आत्ताचा क्षणात संपेल
काही क्षणांची आठवण घडुनी

दि.३०/०६/२०२४
रात्री ०७.३८ वा.



## (२५)
## आई म्हणजे तत्त्व चिरंतन

ही मायेची छत्रछाया जी
माय शिरावर धरते
जगात सांगा कोण आईसम
स्नेह लेकरा करते

येतील कितीही विपदा भयंकर
देह शस्त्र होतो ना
तिच्या मनातील आशीर्वचनही
अस्त्र बाण होतो ना

तिच्या चिंतनी वात्सल्याची
ओढ सदा जाणवे
आणिक स्पर्शातून तिचा तो
स्वर्ग जणु मानवे

श्वासासंगे लेकरु चिंता
काळजात चालते
जन्मभरी ती निज संततीस्तव
हळूच आसू ढाळते

सुख मागावे केवळ आईने
पिलांसाठी निरंतर
पशु पक्षीण की मानव माय ती
भाव तिचे अजरामर

आई म्हणजे तत्त्व चिरंतन
ईश रूप गोडवा
आई म्हणजे जन्मांतरीचा
बंध निखळ जोडवा

दि.१५/०७/२०२४
रात्री ०९.३६ वा.



## (२६)
## हे शिवा शंभो रे

हे शिवा शंभो रे कृपा राहू दे
उभयतांवरी तुझी सदा
सदाशिवा हे नीलकंठ
शंकरा उमापते वरदे सदा

रुद्र काल महेश्वरा त्रिनेत्रा
महाकाल सर्वविग्रहा
मंजुनाथ शिवावरा गंगाधरा
पावशी त्वरा ईश पापहा

घे दुग्धाचा अभिषेक हा
जलधारांची भक्ती
युगुल आम्ही हे पुजतो तुजला
बिल्वदलांची शक्ती

शिवनामाचा जप चालतो
श्रावण पावन आला
नमन तुला हे जटाधरा भवा
शर्वा गिरीशा माला

जशी शिवानी तुझी अर्धांगिनी
प्रिया माझी ही आहे
तिजविण शिव तू शव जो होशी
शक्ती माझी ही राहे

अभेद्य नाते अजोड तनमन
नित्य साधना चाले
हे आत्मिक रे शम्भो शंकरा
आराधित क्षण झाले

दि.०६/०८/२०२४
सकाळी ०८.४३ वा.



## (२७)
## कृष्णबाळा मोह चाळा

कृष्णबाळा मोह चाळा
रूप सुंदर गोड ते
हरखुनी जाते यशोदा
नाते आपुले अजोड ते

डोळ्यातील मोहिनी मज
खिळवुनी ठेवे सदा
जन्मला कोठे कसा पण
माय मज केलेस बा

अधर जिवनी माधुरीची
खाण मजसी लुभविते
गोड पापे किती मी घेऊ
पुण्य कोणते उभविते

गोल गोंडस चेहऱ्यावर
हास्य माधुरी जी विलसे
मोरपीस त्या जावळावर
ओठी बासरी नित बसे

ये रे ये मनमोहना
लाडक्या बाळा प्रिया
मांडीवर बसशील जरा
मज चुंबू दे तव मुखश्रिया

दि.२६/०८/२०२४
सकाळी ०५.४९ वा.
गोकुळाष्टमी



## (२८)
## अनुबंध मग तिथले

उसळून येती सागरात किती
लहरी अपरंपार
चंद्र पाहता चांदण्यासही
मोल चढे चंदार

फेन फेसळे लहरीसंगे
उधाणलेली रात
तशात वाटे हवी हवीशी
प्रिया तुझी रे साथ

कधी कुणाशी नाते जडते
की जुळते ऋणगाठ
सागर असला कितीही उतावीळ
संयमी तितुका काठ

पुनव रातीच्या अवखळ खोड्या
अवखळ लाटा उनाड
कितीही उठती पुन्हा त्या विरती
लहरी भाव पल्याड

असे चालती युगायुगातून
खेळ आगळे इथले
पैलतीरावर सापडतील बघ
अनुबंध मग तिथले

दि.३०/०८/२०२४
सकाळी ०८.४३ वा.




## (२९)
## माझी वात्सल्याची ठेव

आई तुझ्या पदराशी
बाळ सुखावला
मायेसाठी आजही
तुझ्या भुकावला

माया तुझी वाढते ग
वयासारखी
दुनिया न व्हावी माये
तुला पारखी

तरी नको होऊ कधी
दूर माझ्यापासून
आई घे ना कुशीतून
मला तू ग हासून

तुझ्या बरोबर जे मी
जगलो ग माय
त्याच्याविना अमृत
दुसरं ते काय

आहेस तू आहे माझ्या
जवळी हा देव
देवा, हिरावू नको रे
वात्सल्याची ठेव
माझी वात्सल्याची ठेव

दि.०२/१०/२०२४
सकाळी ०७.५४ वा.



## (३०)
## म्हणून देतो जन्म आईला

चोचीमधल्या चोच कहाण्या
पिल्लांसाठी सोस
वात्सल्याचे क्षण हे टिपावे
लोचनात भरघोस

तिन्ही त्रिकाळी येते आई
चारा दाणे घेत
भरवून जाते घास मायेने
एक दिलासा देत

जीव इवलुसे इवल्या गाठी
गतजन्मीच्या नात्यासाठी
कोण कुणाच्या साठी झटते
कोण कुणाच्या राहे पाठी

झिजवून काया झरते माया
डोळे पाणावून
ती असते वा नसते तरीही
काळीज जा न्हाऊन

आई म्हणजे काय रसायन
देवासी कळले ना
म्हणून येथे अवतारातून
प्रेम तिचे फळले ना

असो कोणती काया माऊली
माया तीच दिसते ना
आई बाहेर आई आतून
कणाकणात वसते ना

आई म्हणजे तत्त्व आगळे
तत्वांच्या पलीकडले
आईविना मग जीवन सारे
अडखळून का अडले

उत्तर नाही त्याच्याकडेही
आई अशी घडण्याला
म्हणून देतो जन्म आईला
बाळ पुन्हा होण्याला

दि.१३/१०/२०२४
सकाळी ०९.२५ वा.



## (३१)
## भाऊबीज ओवाळीते

मुक्ताई नि ज्ञानेशाची
आज किती सय आली
भावा बहिणीच्या नात्याला
गोड जरतार झाली

तिची त्याच्यावर माया
त्याची काळजी सखोल
कसे नाते नि जिव्हाळा
बंध प्रेम अनमोल

तुझे माझे की जमेना
तुझ्याविना करमेना
नाते गोड हे अतूट
मन कुठेच रमेना

भळभळत्या जखमेला
सांधे द्रौपदीचा शेला
कृष्ण मायेसाठी पहा
तिच्या दारी की हो गेला

बालपणीच्या स्मृतींनी
गर्दी मनाच्या अंगणी
स्नेह जगावेगळा
येई सुवास चंदनी

भाऊबीज ओवाळीते
तुला भाऊराया
सदा राहू दे तुझी
माझ्या पाठीशी रे माया

दि.०३/१०/२०२४
सकाळी ०९.३५ वा.



## (३२)
## तैसीच वाटे ही चूल जननी

चुलीच्या तोंडात
लाकडांचा आहार
भुकेला देवा
चुलीचाच आधार

जाळून देह काष्ठ
जगवीतात जीव
होऊन कोळसा ते
तरी जगणे असे भरीव

म्हणतात कधीही
ना विझावी घरात चूल
मुखी भकभक आग
तरी लाल अंगार फूल

तीन दगडांची
असते कमाल चूल
उपाशी पोटी भूक
भागवून जाते चूल

देते हिवात ऊब
देते गरम दिलासा
द्यावा जळण्याचा सांगा
चुलीने कसा खुलासा

उपकार अनंत करते
भरिणी पोषिनी ती तोषिणी
जाळते स्वतःस जैसे आई
तैसीच वाटे ही चूल जननी

दि.२६/११/२०२४
दुपारी ०४.३७ वा.



## (३३)
## बीज अंकुरे अंकुरे

बीज अंकुरे अंकुरे
आस उभरून येता
आत भुईच्या कुशीत
रोप तरारून जाता

काय सांगते ती माती
जप बाळा नातीगोती
पानं फुलं कळ्या शाखा
भार कधीही ना होती

होत जाईल विस्तार
मुळं माझ्याशी जोडली
जर असतील सदा
कुणी कितीही तोडली

पुन्हा होईन मी माता
संजीवन स्तन्य देता
पुन्हा पुन्हा नवनवी
संतती की जन्म घेता

आत खोल रुजलेले
धागे स्नेह भरलेले
बंध घट्ट अंतरीचे
शब्दातीत ठरलेले

दि.१२/१२/२०२४
सकाळी ०९.३८ वा.



## (३४)
## बावळ्या कथुल्या खुळ्या

साद मनाची ऐक तू
ऐक राजा भाव रे
बघ दिसे तुजला तुझ्यातच
कोरले मज नाव रे

प्रेम काही आगळे हे
आत्मरूपाची प्रचीती
तू जरा डोकाव आतच
माझी तुज मिळणार रीती

जोडलेले बंध कसले
जुळती ते तर ईश्वरी
हो कृपा त्याची रे जेंव्हा
साथ लाभे वल्लरी

भावनांचे सूर जुळता
गीत उमटून ये असे
साथ देते बासुरी अन
श्रीहरीचे वेध ते

येऊ दे जुळुनी मनीच्या
हळव्या तारा आपुल्या
चालू दे या प्रीतभरल्या
बावळ्या कथुल्या खुळ्या

दि.१७/१२/२०२४
रात्री ११.२९ वा.

## (३५)
## नको दटावू आई मजला

नको दटावू आई मजला
मीच दटावीन आज तुला
का ग करतेस इतकी काळजी
सांग आधी तू सांग मला


कितीदा पुसशील खाल्लेस का ते
कुठे चालले विचारतेस
काय तुला जाणून हवे ते
डोळेही मग वटारतेस

सांभाळून जा, हे कर ते कर
लहान का ग आता मी
किती कावतेस नको खाऊ म्हणतेस
बाहेरचे काही खाता मी

तुझ्या मायेचे कळतंच नाही
मला घट्ट बांधतेस तू
तुझ्याचसाठी बाळा सारे
पुन्हा पुन्हा सांगतेस तू

कळते सारे मला सांगते
ऐक आता तू आई ग
नकोच माझ्या मागे लागू
शहाणी माझी आई ग

दि.२२/१२/२०२४
सकाळी ०८.४६ वा.



## (३६)
## जुळती रे कैसी ही नाती

सांग वेड्या मोगऱ्याला
दरवळू नको सांजसमयी
भेटीलागी आस जीवा
कळवळू नको शांत समयी

तीऽऽ तिथे बघ दूर आहे
पापणीला पूर आहे
भावनांनी जड झाला
आज माझा ऊर आहे

तू असा दिसलास कोठे
गंध कोशी भासते ती
तुज आडूनी मोहिनीशी
प्रियतमा मम हासते की

मी अनावर भान नाही
ओळखीचे सूर काही
त्या तिथे तू दूरदेशी
जळती पणती एक पाही

आसवांचे थेम्बमोती
ओघळून सरितेस जाती
सागराच्या ओढीलागी
जुळती रे कैसी ही नाती

दि.२९/१२/२०२४
रतेय ०९.२१ वा.



## (३७)
## नाते या जन्मीचे

तुझे नि माझे नाते कसले
कुठून जुळल्या तारा
वाहत आली स्वर्गामधुनी
अनुबंधांची धारा

स्नेह कोण साठवून ठेवे
कोण मांडतो हिशोबा
कुठले संचित पदरी पडते
कळते कधी ना तोबा

असंख्य जीवांमधून येती
दोन जीव समरसण्या
या नात्याला विश्वासाची
दोर द्यावी दृढ कसण्या

नियमित व्हावे सिंचन त्यावर
प्रीतजलाचे मधुरम्?
नाते जाईल गोड सुखाची
वाट चालत सुदूरम्?

मानून घ्यावे समजून उमजून
आपुले गतजन्मीचे
बंध म्हणून हे एकसंध हो
नाते या जन्मीचे

दि.३०/१२/२०२४
रात्री १०.३२ वा.




## (३८)
## शिवें पार्वती तू कल्याणी

शिवें पार्वती तू कल्याणी
शिवशंभूची तूच स्वामिनी
गतजन्मीची सती मानिनी
शंकराची आत्मरागिणी


आत्मलिंग मज तूच साथी ग
शिवलिंगाचे तू सामर्थ्य
शक्तीस्वरूपा तू अभिरूपा
तू शब्दस्वर तूच समर्थ्य

आदि अनादी कसला प्रश्न
सदानंदाचा तू आनंद
उदो उदोकारातून गर्जे
माया विश्व स्वच्छंद

तुझ्या संगती परम अर्थ हा
जगज्जननी तू जगतार्थ हा
तूच समाधी पुण्य निधी मज
सदाचार श्रुतीस्मृती स्मार्त हा

एकजीव एकरूप स्वरूपा
दोघे न भिन्न अभिन्न संधता
मुक्त अनाकलनीय विमुक्ती
तरीही आपुली स्वयंबंधता

दि.०३/०१/२०२५
सकाळी ०९.३७ वा.



## (३९)

## घर गोकुळाचा भास

म्हायेराला आलेलं हे
लेकीबाळीचं रुपडं
संसाराच्या येलीवर
फूल फुललेलं गोड

तिच्या आनंदाला सीमा
सांगा कुणी हो बांधावी
माया जीवाच्या जीवाची
रोज नव्यानं सांधावी

तिचं हासणं ते गाणं
अंगणात खिदळणं
बाळराजासंग तिचं
बाळ होऊन खेळणं

खुळखुळा झांज वाजं
खुदूखुदु स्वर गाजं
आजी इसरती समदं
नातासाठी कामकाज

तेल मालिश धुपारे
कवळे उन्हं आन वारे
तान्हुल्याच्या खोड्यामंदी
या हो दंग व्हा ना सारे

घरादाराला बांधून
जाय आता की रांगून
बोबड्या त्या बोलामंदी
कृष्ण माया दे सांगून

यावं फिरून जगणं
तसं बाळा तुझं येणं
माझ्या लेकीच्या मायेचं
देव किरपेचं लेणं

किती दिसाचा पाहुणा
आजोळाचा झाला राणा
बाळ व्हटामंदी चिमणा
चिमणा घास तुम्ही घ्या ना

खेळा बागडा हुंदडा
घर गोकुळाचा भास
दुधावरल्या सायीची
आजी जीवाला ही आस

दि.१२/०१/२०२४
सकाळी ०९.५८ वा.

## (४०)
## दुधावरची साय

माया जेंव्हा रूप घेते
साकारते माय
तिच्या वात्सल्याचे स्तन्य
दुधावरची साय

वासराच्या ओढीलागी
हंबरते गाय
तिचे मूक काळीज हे
दुधावरची साय

घरट्यात पिल्लं
चोचीमध्ये दाणा जाय
पक्षिणीचे प्रेम होई
दुधावरची साय

कासवीच्या नजरेनं
पिल्लं वाढताय
पोसते ती पाहताना
दुधावरची साय

ऋण कसे फेडणार
दुधाचे कोणी
अमृताची ठेव आई
ठेव संभाळोनी

सायीसाठी दूध मंद
आचेवर तापवा
माय कशी कुणी तिच्या
सारखे दाखवा

काही नका मागू दुजे
धरा तिचे पाय
आई म्हणजे जिव्हाळ्याच्या
दुधावरची साय

दि.१९/०१/२०२५
रात्री ११.५३ वा.



## (४१)
## प्रियवरा वळून पाहतो का

हे कुठले जडले नाते
कुठल्या ह्या रेशीमगाठी
कोठून वाटते कोणी
जन्मले आपुल्या साठी

सौंदर्य ओतप्रोतून
ईश्वरी स्पर्श ओतून
स्थळ काही उरती इथले
लावून ओढ आतून

बघ समोर पर्वत रांगा
लाजून धुक्यातून दडल्या
येथेच सरोवर काठी
जवळीकता आपुल्या घडल्या

हलकेच चालते नौका
कधी उगाच चुकतो ठोका
मी अजून तेथे आहे
प्रियवरा वळून पाहतो का

क्षण सुंदर सुंदर इथले
लोचनात अलगद टिपले
चल पुन्हा पुन्हा जाऊनिया
पाहू जे चित्र मज दिसले

दि.२७/०१/२०२५
रात्री ११.३८ वा.




## (४२)
## सांगू कसे श्रीरंगा

मी दंग दंगते ना
तुज रंगी रंगते ना
सांगू कसे श्रीरंगा
तुजसंग संगते ना

बुडते सुरात वेणू
मज अंतरात वाजे
वाकून पाहते तर
ह्रदयात तूच साजे

बघ आसमंत सारा
संमिश्र वाटतो हा
कोठे तो वाटे राधा
कोठे नि सावळा हा

बुडतो रवी तरीही
थोडा थबकतो आहे
पाहण्यास प्रीत आपुली
किंचितसा थांबताहे

वेड्या भरात सांज
रेंगाळते कधीची
नाती जुळून येती
आताची ना आधीची

दि.३०/०१/२०२५
सकाळी ०६.३७ वा.



## (४३)
## प्रिया कृष्णवरा तूच ना....

का मिटले तू राधे डोळे
सांग जरा तू सांग ना
रूप तुझे मग साठवताना
आत बाहेर तूच ना
प्रिया कृष्णवरा तूच ना....

उगाच वाटे सत्य आहे की
श्याम तू नाझी कल्पना
वृंदावनी येतील कानी बघ
वेड्या काही जल्पना

राधे तुला न सोडीन कधीही
डोळे उघडे वा झाकता
जसा स्वर्ग सापडे नभाला
भुईवर अलगद वाकता

काही नाती कैसी जुळती
उत्तर कोणी द्यावे
ओंजळीत जे दान मिळाले
सार्थक होऊन जावे

असेच राहील नित्य निरंतर
प्रेम आपुले गहिरे
ना देहाचे बंधन अथवा
ना जन्माचे फेरे
ना जन्माचे फेरे.....

दि.०१/०२/२०२५
सकाळी ०६.१९ वा.



## (४४)
## शोनुली गोडुली बाहुली

शोनुली गोडुली बाहुली
माझी लाडाची छकुली
नाजुक सुंदर कवळी
सानुली माझी बकुळी

एक खरी सखी राणूली
हासते गालात खळखळू
भावना नाजूक फुलांच्या मनात
जणू ही वागते अळुमाळू

वेलीवरले फुल कोमल
सुगंध तिचा लागे दरवळू
चैतन्याची खणी माझी ही मनी
आहे किती हो मायाळू

जरा वागते लाज लाजाळू
हिरमुसते ना कैसे तिज कळू
आहे सुकुमार अशी अलवार
पुष्पा सुकुमार माझी कळू

हुंदडते बागडते पळते
वात्सल्य खेळाचे खेळ खेळू
पदरी आली सोनपरी माझ्या
क्षण सोन्याचे भाग्याने मेळू

दि.०३/०३/२०२५
सकाळी ०७.३२ वा.



## (४५)
## माझं सपान मानीन

सपनांच्या टोपडीत
खुललेला ग मुखडा
बारमास झोपडीत
वसतोया की दुखडा

घर फाटकं फाटक्या
साऱ्या चिंध्या घरभर
मन पाहत राहतं
काही सपनं भरभर

आता आता तू सामोरी
आता हापिसर झाली
माझी चिमणी उडून
दूर आभायात गेली

किती सरले वरीस
आता सानुली तू मोठी
कशी रुबाबात तू न
चार पैकं तुझ्या गाठी

गाडी बसायाला तुला
सलामीला ते चाकर
आता पोटभर मिळं
समद्यांच्या पोटा भाकर

म्या ग दारात थांबून
तुझी नजर काढीन
पानामंदी ग्वाड धोड
समदं राणीच्या वाढीन

घास सुखाचा तुला ग
माझ्या हातानं भरवीन
लेक आनंदाची खाण
धडा आनंदे गिरवीन

तुझ्या व्हटातलं हासू
मोती जपून ठेवीन
एक सपान जे तुझं
माझं सपान मानीन

दि.०८/०३/२०२५
रात्री ११.४२ वा.



## (४६)
## धागा मोरपीस

तुझ्या माझ्या नात्यातला
धागा मोरपीस आहे
तुझ्या माझ्यातला दुवा
मोरपीस सख्या राहे

रंग त्याचे जे खुलती
तेच मना भुलविती
रानावनात वेणूच्या
स्वर कुना डुलविती

यमुनेच्या जळामध्ये
लाटा उसळती दंग
त्यात प्रतिबिंब दिसे
पहा सावळा श्रीरंग

तुझ्या माझ्या नात्यामध्ये
एक सांज की सांजते
ती न ढळते चळते
राधाराणीला छळते

आजही जा वृंदावनी
सांज सावळी शोभते
मोरपीस माथ्यावर
कृष्णप्रेमाने राजते

दि.०९/०३/२०२५
रात्री ११.४८ वा.



## (४७)
## तुझे माझे नाते, द्वैत की अद्वैत

तुझे माझे नाते इथले की तिथले
द्वैत की अद्वैत कसे सांगू
मन म्हणतं नकोच त्यात अडकू
मनावर एक मोरपीस टांगू

रंग तुझा सावळा नि रंग गोरा माझा
बघणाऱ्याच्या नजरेतले रंग ते
एकरूप होऊन गेलेलो आपण तर
मी सावळी तू गोरा असेच संग ते

यमुनेच्या जळात वेणूच्या सुरात
वृंदावनी काननात तूच तू
राधे राधे जपता जन
मनामनात तूच तू

कुणी म्हणतं राधेनं
चोरीला की कृष्णा
कृष्ण म्हणे राधा माझी
अधुरीशी तृष्णा

मीलनाची ओढ की ते धागे
कुठे सांधले कुणी बांधले कुणास ठाऊक
डोळ्यातून झरतात न आजही
आपुल्या प्रीतीच्या स्मृती भावुक

लीन म्हणे तल्लीन आपण दोघे
तनमन कणकण आपण दोघे
एकच तत्त्व दोन प्रकारे तरी एकच
असे प्रकटलेलो आपण दोघे

दि.२०/०३/२०२५
सकाळी ०८.१२ वा.



## (४८)
## गाली हसू तर दुःख पांगते

कसली नहाणी थंडच पाणी
रस्त्यावरची अंघोळ कहाणी
गरिबी आपुली आहे तरीही
आनंदाची गाऊ गाणी

तसेच वाटे पडता पाणी
राजमहाली राजा नि राणी
जरी कुठेही न्हालो तरीही
स्वच्छ अंग हे नको ती घाणी

कुठली साबण फेसही कुठला
रंग मातीचा अंगी उमटला
काळे काळे डाग जरीही
जीव समाधानाने नटला

खाण्यासाठी उष्टे मिळते
जीवन काय हे रोजची कळते
सारे सारे विसरून जाऊ
रोज नव्याने जगणे वळते

ये ये भावा अंघोळ घालते
बहीण तुझी मी तुला सांगते
काही असू दे अथवा नसू दे
गाली हसू तर दुःख पांगते

दि.२७/०३/२०२५
सकाळी ०९.३२ वा.




## (४९)
## मनी चिमणा उपजे ना

ये ये चिमण्या घेत चिमणीला
संगे तुझ्या मज दारी
विरु न दे अशी किलबिल सुंदर
चिवचिव वाटे भारी

अंगण गजबज तुमच्या सुराने
सकाळ मधुरा होते
पहाट वेडी चिमणी गाणी
गाऊन जागी होते

दाणा दाणा टिपता तुम्ही
सोबत संगत ठेवून
कसा करावा सुखसंसार हा
प्रेम अमापसे देऊन

पाण्यामध्ये डुबकी डुब डुब
ओले पंख फडफडणे
प्रीत जाणते चिमणा चिमणी
तुमचे गोड बडबडणे

घरटे सुंदर घरकुल मोहक
पिल्लू त्यात निपजे ना
रोज छानसा विचार माझ्या
मनी चिमणा उपजे ना

दि.०३/०४/२०२५
रात्री ११.४७ वा.



## (५०)
## हृदयी साठवू प्रभु श्रीराम

हृदयी साठवू प्रभु श्रीराम
सदा आठवू हो श्रीराम
पुण्य फळावे ऐसे नाम
श्रीराम जय राम जय जय राम ।।धृ।।

जसा विराजित हनुमंताच्या
हृदयसिंहासनी तू राम
तुजविण माझे अन्य नसे प्रभू
कधी कोणते मुक्तीधाम
श्रीराम जय राम जय जय राम ।।१।।

सीतामाई अर्धांगिणी तव
तू आदर्शाचे परिमाण
पुत्रबंधु वा पती की स्वामी
मित्र शत्रूंचा तू अभिमान
श्रीराम जय राम जय जय राम ।।२।।

श्रीविष्णूच्या अवताराचे
रूप सातवे तू अभिराम
एकबाणी एकवचनी
एकपत्नी तू मोहक राम
श्रीराम जय राम जय जय राम ।।३।।

मंत्र पावतो तंत्र सुखावे
तू निज आनंदाचे नाम
चैतन्याचे रूप सावळे
पावन धरती हो श्रीराम
श्रीराम जय राम जय जय राम ।।४।।

अनन्य देवा तुझी ती कर्मे
अनन्य रिपु संहारी काम
ऋषीमुनी जाती नित्य सुखाऊन
मर्यादा पुरुषोत्तम राम
श्रीराम जय राम जय जय राम ।।५।।

दि.०६/०४/२०२४५
दुपारी १२.३३ वा.
रामनवमीच्या राममय शुभेच्छा

## (५१)
## नाते भासे अनोळखी

ज्यासाठी तुटले काळीज कधी
ते नाते भासे अनोळखी
कसे विसरती लोक क्षणातच
ऋणानुबंध नि त्या ओळखी

जे सर्वस्वाचे दान होते कधी
आता नवखे का व्हावे
कुणी कधीतरी किती साहले
सहजी विसरून का जावे

जे रंग जीवनी होते भरले
तेच हात कसे सोडावे
जन्मोजन्मीचे नाते जोडता
तेच कुणी कसे तोडावे

ज्या मनाने मन वाहिले
त्यास कसे मग विसरावे
समज नव्हे मग गैरसमन किती
कुणी कशाला पसरावे

वळण वेगळे येता अवचित
वाट वेगळी का धरली
दिशा संपल्या अंधारातून
मिणमिण पणती बघ उरली

दि.०९/०४/२०२५
सकाळी ०७.२४ वा.



## (५२)
## घे पदरी तुझ्या

आई तुझ्या पदराचे मोल ना कधी
उन्हं किती तापली पण झळा ना कधी

जन्मलो नि पदरात अमृताचा पान्हा
तूच जीवनाचा रस पाजविला तान्हा

नीज तुझ्या पदरात शांतसी झाली
ऋतू बदलती तशी पदरी निमाली

उन्हाळ्यात ताप गेला हवा दे पदर
सावलीचे छत होई आईचा पदर

पावसाळ्यातुन झाली छत्री पदर
हिवाळ्यात ऊब देतो वात्सल्य पदर

हात पुसाया मिळतो आईचा पदर
डोळे भरताच आसवांनी ये पदर

अंथरून होतो होतो पांघरून मला
रक्त भळभळताच चिंधी ये कामाला

ऊब लागे जीव जागे मायेने तुझ्या
आई माझे अपराध पदरी तुझ्या
घे पदरी तुझ्या

दि.११/०४/२०२५
सकाळी ०७.३३ वा.



## (५३)
## आई वेडी एक बेडी

इवल्याशा पावलांचे
सुख अनमोल
दुनिया आईची फिरे
लेकरांभोवती गोल

श्वास कसे भारलेले
त्याच्या श्वासाने
जगणेच जणू भरे
त्याच्या ध्यासाने

पाजविता पान्हा कान्हा
सुखावीत जाय
किती उपकार त्यांच्या
मुळे घडे माय

चुकलेल्या हुकलेल्या
क्षणांना मागते
आई वेडी एक बेडी
अजब वागते

कुणी म्हणे पाळण्यात
दिसतात पाय
कसेही असले बाळ
माया होत जाय
आई माया होत जाय

दि.२४/०५/२०२५
सकाळी ०८.४९ वा.



## (५४)
## चिमण्या स्वप्नातून रमे आई

चिमणे चिमण्या मस्त दंगल्या
डहाळीवर झुलत्या
चिव चिव चाले धुंदीमध्ये
ऋतुराण्या फुलत्या

हिरव्या हिरव्या पालवीत का
लपाछपीचा डाव
जागवीत ह्या जाती चिमण्या
सुखासुखीने गाव

त्या असताना जाग सहजशी
नीज चिमणीची होते
चिमणी गाणी गात बाळाची
आई अंगाई गाते

मग येती ह्या चिमण्या राण्या
कथेतल्या नायिका
चिमण्या ओठाच्या बाळाचा
गोड पापा प्रत्येका

चिमण्या जिवनीमधुन डोकवती
चिमणे चिमणे दात
चिमण्या स्वप्नातून रमे आई
चिमण्या पापणी आत

दि. २५/०४/२०२५
सायं. ०६.३८ वा.



## (५५)
## काय करयोय बाबा

काय करयोय बाबा
तु रे घोडा घोडा हो ना
माझ्यासारखाच सान तुही
थोडा थोडा थोडा हो ना

अरे बस उघडबंब
अगडबंब आहेस की
माझ्यासारखाच तुही
आईमागे राहेस की

नको बाबा अंघोळीची
तू तरी घाई करू
तुही बैस पारोसाच
मिळून गाई गाई करू

आज जरा मऊ भात
मेतकूट खाऊन बघ
टॉनिक सारे घ्यायचे आहेत
माझ्यासारखे लगोलग

मनासारखे काही नसते
मोठे करतील तेच खरे
उगाचच म्हणता तुम्ही
बाळ होतो तेच बरे

दि.२७/०४/२०२५
सकाळी १०.४८ वा.



## (५६)

## जन्म सारा तुझ्यासाठी

ये न बाळा आईच्या रे कुशीत खुशीत
वात्सल्याचा पान्हा मिळे मायेच्या मुशीत

रूप तुझे लेकरा रे बालमुकुंद
अंगाखांद्यावर खेळे गोड गोविंद

तुला अंजारता गोंजारता सुख वाटे
आईपणाचीच मला लागे भूक वाटे

जन्म सारा तुझ्यासाठी श्वास वेचले
जगताना मरताना ध्यास घेतले

छबी तुझी मनामध्ये जीव दंगला
तुझ्या भोवताली माझा जन्म रंगला

दि.०५/०५/२०२५
सकाळी ०७.४६ वा.



## (५७)
## आता नमिते तुला प्रभाकरा

आज उगवत्या सूर्या सांग बरे
काय घडे या क्षणाला
रोज येशी अन नव्याच देशी
आकांक्षा या मनाला

तुला पाहता वाटे मजला
जीवन नवीन लाभे
जीव नव्याने प्रत्येकच मग
उत्साहाने वागे

आकाशातील तुझी भ्रमंती
किती काही घडवून जाते
तुझे नि माझे असे सनातन
दिनराजा आहे नाते

तुझ्याच साक्षी घडते सारे
तूच तेजोमय कांती
तुझ्यामुळे या जगास ऊर्जा
तुझीच नभात क्रांती

आता नमिते तुला प्रभाकरा
जीवन उजळून जावो
तुझीच ऐसी आदर्शाची
वाट मज मनी राहो

दि.१०/०५/२०२५
सकाळी ०७.३९ वा.

## (५८)
## पोकळी नात्यात होते

पोकळी नात्यात होते
आणि सारे फोल ठरते
संपते ते प्रेम आणिक
दूरी केवळ हाती उरते

जीव जेथे जडविलेला
का जीवावर कोणी उठते
आरोपांच्या गोळ्या झडती
गाठ सैलसी होत सुटते

ती दिलेली आर्त हाक न
आता कोठे पोचते
वाऱ्यासंगे बोलणेही
उडून व्यर्थचि बोचते

हात निसटून साथ सोडून
जाय कोणी दूर जे
भावनांच्या हुंदक्यांनी
कोंडलेले पूर ते

वाटते आता अनामिक
कोणीही ना जवळचे
नाव ज्याचे घ्यायचे ते
कोण आपुले नवल ते

दि.०२/०६/२०२५
रात्री ११.५६ वा.



## (५९)
## ऋणानुबंधांचे बंध अगणित

ऋतू अंगावर बहारलेले
नभ मेघांनी भरून गेले
धरणीवरती आकाशाचे
नाते आगळे उरून गेले

फुलती पाने फुले डोलती
कोंब कुशीतून हळू बोलती
आज इथे हे भविष्य उमलून
आनंदाला क्षण हे तोलती

हिरवी हिरवी तृणे खेळकर
स्पर्श रेशमी रुळे अंगावर
कळ्या लाडूल्या गोड गोजिऱ्या
किती भाळावे मधु रंगावर

कोण कुणाची वाट पाहते
कोण इथे मग रमून राहते
कुणास लगे ओढ अनोखी
कोण कुणावर जीव वाहते

कसे हे जुळते नाते अनामिक
ऋणानुबंधांचे बंध अगणित
मनास सांगा कसे बांधावे
जगा भरभरून जीवन क्षणिक

दि.०६/०६/२०२५
रात्री ११.३८ वा.



## (६०)
## **किती पावसाळे हे यावे**

पाऊस आला घेऊन ओला
सुगंध दरवळणारा
मनात नाचे मोर फुलोरा
मोद हा सळसळणारा

घे पानांची छत्री हिरवी
बरव्या पाऊसधारा
सांग सखे चल घेऊ आडोसा
प्रीत वर्षाव सारा

जलबिंदूची सरगम ऐकून
गीत मल्हार गाऊ
तुला हवे तर राणी माझी
चिंब वर्षावी न्हाऊ

चोचीमध्ये थेंब गारवे
मस्त तुषार उडावे
पावसात ह्या आनंदाचे
मेघ बरसू पडावे

सोबत बसुनी धुंदीमध्ये
स्वप्नं घरटे विणावे
किती पावसाळे हे यावे
नाते रुजुनी जावे

दि.०७/०६/२०२५
रात्री ११.५३ वा.



## (६१)
## राजहंस राजा दिसे

मी हंसिनी आई पिल्लांनो
सांगते ऐका बरे
चाल आपुली राजेशाही
वागणे तैसे खरे

कमळतंतु जे मृणाल ते
खाद्य आपुले प्रिय असे
मोती घेऊन चोचीमध्ये
राजहंस राजा दिसे

चालताना ऐट ठेवा
घाई ना कसली कधी
बाज येवो पोहताना
उडताना ही शान आधी

मान वेळावून पाहून
नजर वाटे देखणी
पंख शुभ्र हे रंग निर्मल
त्याची करा रे राखणी

राजहंसाचा विवेकी
गुण तुम्ही जपणार ना
शहाणी माझी बाळं मोठी
होत गुणी होणार ना

दि.१९/०६/२०२५
रात्री ११.५४ वा.

## (६२)
## बहरली वेल नात्यांची

बहरली वेल नात्यांची
ती गगनावरती चढली की
धरुनी हात हातात
मृण्मयी होत गढली की

मुळांनी घट्ट थांबावे
जरा मातीत लपताना
कोंब येतील जोर धरतील
वादळातून जपताना

राहुनी पाठीशी त्यांना
कितीदा बळ द्यावे केवढे
तरीही अलगद दूर व्हावे
रसाशी देऊनी तेवढे

अपेक्षा का करावी की
फुले फळणार ती मजला
ऋतूंच्या भाग्यरेखेने
वेलु डुलणार की चंचला

करुनी कर्तव्ये निज सारी
तिला आधार मग द्यावा
उडू द्यावे तिज वाऱ्याशी
मोद मग त्यातची घ्यावा

दि.३०/०९/२०२५
रात्री १०.३२ वा.



## (६३)
## सांज टेकली क्षितिजपाशी

कुठून कोणत्या वाटा गेल्या
तुझ्या नि माझ्या राजा
सांज टेकली क्षितिजपाशी
तिचा न गाजावाजा

एक पूल साधला नव्याने
नवीन नाते झाले
गतजन्मीचे बांध आपुले
हलके जुळून आले

असेच बसले तुझ्यासवे मी
गतकाळाची पखरण
दबून गेल्या आठव दुखऱ्या
खपल्यांची का उकरण

प्रकाशझोतासवे किरण मग
आशेचा पाहिला
इथेच आपुला विरंगुळाही
विसाव्यास राहिला

रंग वेगळे आकाशाने
पांघरलेले आता
कुठून येती स्वर सुंदरसे
कानी कुणी न गाता

दि ०३/१०/२०२५
रात्री ११.५८ वा.



## (६४)
## ओल्या पंखांची झळाळी

थेंब थेंब बरसले
नभ असे गाभूळले
ढगाढगाशी सुरात
गाणे पावशी जुळले


ऋतू आधी एक होता
आता भरवसा गेला
शरदात चांदण्याला
पावसाने झोका दिला

हवा हिवाळी ओलेती
चिंब दिवाळी चालली
कुणी मंदाकिनी आता
वेळी अवेळी गाळली

वेडी वर्षाराणी अशी
कधी कधीही बरसे
जीव थांब म्हणूनिया
आता जगण्या तरसे

या रे या पिल्लांनो जवळी
मोजा पावसाच्या ओळी
पांघरून किती घ्यावी
ओल्या  पंखांची झळाळी

दि.१२/१०/२०२५
रात्री ११.४३ वा.



## (६५)
## भाग्यास कोण लांघा

नाते तुझे नि माझे
आपसूक जुळून आले
विधीचे विधान आहे
ऐसे कळून आले

ठरवून वीण कधीही
जुळते का या जगात
दिसले अनंत जरीही
ठरते कुणी मनात

वाटे कुणास पहाता
आयुष्य मूर्त झाले
जगणे पुन्हा नव्याने
जगण्यास इथे आले

का आवडे कुणी ते
सांगावे कसे सांगा
जुळवून ठेवलेल्या
भाग्यास कोण लांघा

वाटे ही निवड माझी
नशिबास बांधलेली
गतजन्म चांदण्याची
ओळख मी साधलेली

दि.१३/१०/२०२५
रात्री १०.३५ वा.



## (६६)
## प्रीत पाडवा भेट तुला घे

देहापलीकडे आत्म बंधाच्या
दृढ गंधाचा गोडवा
त्या पतिपत्नी नात्याविषयी
सांगे दिवाळी पाडवा

मिरवत असते सखीं जीवनी
तीच प्रेयसी होते
प्रसंग येता आई बनुनी
काळजीस जी वहाते

तिच्या विना ना घर सार्थक हो
जगणे अर्धे अधुरे
तिच्या प्रीतीच्या सरिते पुढती
जीवनसागर अपुरे

लोचनातल्या दो पणत्यांच्या
ज्योती माझ्यासाठी
पंचप्राण ही सहज ओवाळी
पतीच्या प्रेमासाठी

पतनापासून सदा वाचवे
ती पत्नी हो सार्थ
झिजते झटते आणि कष्टते
नाही उरी तिज स्वार्थ

आज शुभदिनु या नात्याची
जाण प्रकट करण्याचा
ओवाळील ती क्षण तो अमूल्य
मौलिक मी भरण्याचा

सखे लाडके रहा सोबती
काही नको मज अन्य
प्रीत पाडवा भेट तुला घे
प्रेम बहरो अनन्य

दि.२२/१०/२०२५
सकाळी ०७.१७ वा.

## (६७)
## सण भाऊबीज येतो

एका झाडावरूनी फुलणे
तरीही वेगळे जीवन
जसे कळ्यांचे तसेच आपुले
भावंडांचे मधुबन

मुळे सारखी घट्ट विचारी
तरी भिन्न डोलणे
वाचा शिक्षा जरी सारखी
तरी भिन्न बोलणे

ऋतू पाहिले किती सारखे
तरी स्मृती आगळ्या
प्रत्येकाच्या दैव परडीतील
भोग कळ्या वेगळ्या

जिथून निपजणे तिथून जाणे
दूर कुठेतरी रुजण्या
तरीही कोणते बंध सांधती
जिव्हाळ्यास सांगण्या

सहोदरे जरी असतील कुठेही
मूळ खुणावत राही
कुणा न कळणे ऐसे जुळती
ऋणानुबंध हो काही

भावंडांच्या प्रेमभराचा
सण भाऊबीज येतो
नव्या नव्याने या नात्याला
स्नेह परमतेस नेतो

दि.२३/१०/२०२५
रात्री १०.३८ वा .

# लेखिकेचा परिचय


- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक - संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर - ४०० ००५

  ई-मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४


**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२० प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित ''वैदिक साहित्याचा इतिहास'' (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा:** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

‘‘**साहित्यिक व्रत**’’ म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील ‘हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’ मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक ‘विवाह संस्कार’ २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्याय:, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर ‘प्राचीन भारतीय समाज’, ‘सूर्य शक्ती और मानव’, ‘कौटिलीय अर्थशास्त्र’, ‘स्मृतीग्रंथ – भाग १ और २’ ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

  त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा – नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी

अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), मृद्गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी-जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड-गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग-निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा, सृष्टीगंध, युगंधरा, सुख सुखाचं, पानापानातली कथा (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश, निरव नमन (देवभक्तीपर), मंगेश, आंदण (प्रासंगिक), रूप-स्वरूप, श्रीरंग (राधाकृष्ण), अलवार, मधुश्री, सहा सोहळे (ऋतू), सुधांशु (चंद्र), दिव्यांतरी (सूर्य), बकुळफुले, अळुमाळु, सुरभी, कामिनी, फुललेलं मौन (फुलांवरील कविता), खाणाखुणा (पशु), वैष्णवी (पक्षी), नादश्रुती, श्वेता, शब्द तुझ्या नावाचे (तिच्यावरील प्रीत कविता), स्वामिनी, मृणालिनी, उडण्या हे आभाळ (स्त्रीजीवन), प्रमिला (धरती-आकाश), लाघव वेळा (सकाळ-संध्याकाळ), मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती, क्षणांचं देण, आयुष्याचं गाव (जीवनपर कविता), प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर, दरवळ तुझे नि माझे (त्याच्यावरील प्रीत कविता), मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी (ललितलेख), बोल बरवे, मनस्विनी, हृदयस्पर्शी (रसिक प्रतिक्रिया - कवीश्वर), प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (अन्य रसिक प्रतिक्रिया), गंधराणी (मिश्र कविता), श्रावणी (पाऊस कविता), उल्का (गझल), तेंव्हा (वेळा), नभ मोजताना (धरती-आकाश), जरा रेंगाळले (वाट), रंगतनु, कृष्णकांत (रंग), कविता माझी, लोभसवाणी (सर्वोत्कृष्ट कविता), कवडसा, मृण्मयी, अबोली, अनावर मना, मल्मली, अक्षरा, अनुरंग, नवी नवेली, मन ओथंबुन गेले, उमलवाट, (मिश्र कविता) मन मनुल्या, शब्द पाखरं, वेध मनाचा, मन मोहरून माझे (मन), सुखाचा किनारा (सुख-दुःख), आनंद गंधपाणी, दूर त्या तिथे (गंध-सुगंध), थांब जरा तू (नाती-गोती) यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग-१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात - डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये 'मंजु मंजिरी' आणि 'सर्ग निसर्ग' नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके –**

(पशु–पक्षी – घरटे) स्पंदनरेषा, (चंद्र आणि लज्जा या भावनांवरील कविता) – घडते नवेच काही. (संस्कृत बाल काव्यसंग्रह) – बालमोदिनी, सुधा मूर्ती यांच्या 'तीन हजार टाके' या मराठी पुस्तकाचा संस्कृत अनुवाद – त्रिसहस्रसीवनम्, (संस्कृत अनुवाद) – मनुष्यः.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२–२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१
- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०

- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल-साहित्य पुरस्कार २०२९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८
- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री<br>मुलाखत,<br>दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source=whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialsharebuttons |
| ३ | "आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे." साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय<br>राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/mah<br>a_governor/status/<br>@maha_governor<br>1439559856764030979<br>?s=08<br><https://twitter.com/mah<br>a_governor/status/143955<br>9859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान<br>'प्रकाशवाटा' या डॉ. प्रकाश<br>आमटे यांच्या आत्मचरित्राचा<br>संस्कृत अनुवाद<br>डॉ. कुलकर्णी<br>यांनी 'प्रकाशमार्गा:' | https://www.loksatta.com<br>//lokrang/sahitya-<br>akademi-award-for-<br>translation-autobiography-<br>of-prakash-<br>amte-poet-prof-dr-<br>manjusha-kulkarni-<br>prakashwata-zws-<br>70-2612674/lite/<br>?utm_source=whatsapp_<br>web&utm_medium=social&<br>utm_campaign=socials<br>harebuttons |
| ७ | https://mr.wikipedi<br>a.org | https://mr.wikipedia.org/<br>wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>यांचा महाराष्ट्र राज्याच्या<br>मा. राज्यपालांच्या हस्ते<br>अभिनव साहित्यिक विक्रम<br>केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/<br>6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/<br>7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com<br>MahaGovtMic/status<br>1476551366352924<br>672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/<br>InfoVidarbha/status/<br>1418559733921816<br>580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर<br>डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>सखी सह्याद्री - डीडी<br>सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/<br>VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/IT<br>LxInwuJc ; https:/<br>youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह<br>डॉ.मंजूषा कुलकर्णी /<br>नवरात्री स्पेशल /<br>सकाळ मीडिया | https://youtu.be/<br>m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=126653335052919 8id=100015176343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=4429100480484776 id=100001546044035 sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम – ''सर्ग_निसर्ग'' ऑडिओ अल्बम – ''मंजुमंजिरी'' | <https://vy6s8.app.goo.gl/NKnJ> https://vy6s8.app.goo.gl/A8Z5 |
| १८ | Special Screening of 100th Episode of Mann Ki Baat from Raj Bhavan | https://www.youtube.com/live/7-dyWQaLA?si=mid7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग – १ | https://youtu.be/TrNMBV_ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग –२ | https://youtu.be/NpvMk-Pu4dOs?si=typfHtOvNg-1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : १२५
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : ०५
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

• • •